१८८८ २०७
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
ग्रा. नं. २९१

काव्य

( आर्यन्घुभागनोच्या ...
आत्माराम पांरश्वर पाठार
यांनी तयार केलें.

म. ग्रं. सं. ठाणें

सन १८८८

लेखक आ. मो. पाठारे
६६७

पुस्तकाचें नांव महानंदा

# महानंदा.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं २८७

## मंगलाचरण.

पद.—खमाज, धुमाळी.

श्रीमन्मंगलमूर्ती मंडित मंगलधामा गणराया ॥ पाशांकुश अंकुशधर मूषकवहना हे पार्वति तनया ॥ धृ० ॥ तव वर लेशहि जरी मिळे तरि अघटित यत्न सफल व्हाया ॥ वेळ न लागे जाणुनि ऐसें रचितों मी हें प्रभुराया ॥ काम, क्रोध, मद, मत्सरादि षड्रिपु गांजिति तैशी माया ॥ धांव, धांव, झडकरि विघ्नेशा दीनाशय पूर्ण कराया ॥ श्री० ॥ १ ॥

पद.—कालंगडा, धुमाळी.

स्तवूं सतत या जगदोद्धारक शिव, शंकर

१ दीन असा जो मी, त्या माझी इच्छा.

भोळा ॥ भक्त, सुरेश्वर[1], महामुनी, ते वंदिताति ज्याला ॥ धृ० ॥ उत्पत्ती, लय आणि स्थिती असती ज्यापासोनी ॥ हरुनि सकल विघ्नें दुष्टजनां शासन जो करुनी ॥ पोटिं धरोनी भवपाशांतुनि भक्तां सोडवुनी ॥ अंतिं स्वपदिं नेउनि सुखवी जो हरुनी दुःखाला ॥ स्त० ॥ २ ॥

**पद.**—खमाज, त्रिवट.

कश्मिर देशीं पूर्वीं होती ॥ वारयोषिता[2] महानंदा ती ॥ धृ० ॥ सौंदर्यें जी लाजवि रतिला ॥ ऐशी लावण्याची मूर्ती ॥ का० ॥ विनयादिक[3] हीं चिन्हें जीच्या- ॥ ठायिं स्वभावें वसलीं असतीं ॥ का० ॥ ३ ॥

**साकी.**—जोगी.

तटस्थ किन्नर होति, कोकिला ऐकुनि मंजुल गाना ॥ जिचें नृत्यकौशल्य पाहुनी नृप

---

१ इंद्र. २ वेश्या. ३ नम्रता, इत्यादि

डोलविती माना ॥ भाग्या पार नसे ॥ शीवर छत्र सदा विलसे ॥ धृ० ॥ ४ ॥

**दिंडी.**—हिलांबरी, दादरा.

असुनि वेश्या जी पतिव्रता, होतें ॥ प्रिय न कांहीं शिवभक्तिवीण जोतें ॥ तुम्हीं परिसा, काशि शिवें उद्धरोनी ॥ स्वपादें नेली मिरवीत ते विमानीं ॥ ५ ॥

**पद.** ( बलसागर० )

एकादिनीं कैलासीं शंकर बोले गिरिजेप्रती ॥ 'पाहियल्या अवनीवरि या मी पतिव्रता त्या अती ॥ धृ० ॥ धन्य, धन्य, ती महानंदा तुज काय सांगु पार्वती ॥ वेश्या असुनी माझ्याठायीं फार तिची भक्ती ॥ अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरि, असतां ॥ पतिव्रता परि नाम योग्य तिस, धन्य तीच जगतीं' ॥ एक० ॥ ६ ॥

पद—झिंजोटी, त्रिवट.

परिसुनियां ईश—वाणी हिमनगजा कोपुनी ॥ बोले कीं, 'नवल वाटे वच तुमचें ऐकुनी' ॥ 'दाखवितों तुजशि याचा प्रत्यय, ती कामिनी॥ खरि साध्वी नाहिं किंवा आहे या कुंभिनीं' ॥ परि० ॥ ७ ॥

दिंडी.—कानडा, दादरा.

चंडिकेशीं बोलुनी असें भोळा॥ वेश करिता सौदागरी जहाला ॥ महानंदा, पातला गृहीं तीचें ॥ झालि तन्मय सति बघुनि रूप त्याचें॥८॥

पद. ( तस्करांहातीं• )

स्वहस्ताकिं पूजा ॥ करुनायां त्याला ॥ सतीनें मंचाकिं बैसविला ॥ कपटवेशी तो ॥ शिव त्या समयाला ॥ करीतो काय पहा कातिला ॥ पृथ्विमोलाच्या ॥ काढि कंकणाला ॥ बघुनि तें हर्ष बहू सातिला ॥स्व०॥ ९ ॥

---

१ पार्वती.

कोल्ही २०१०



**श्लोक.**-कामदा.

मग ह्मणे, तया 'पृथ्विमोल हें ॥ खाचित मानवी कराणि ही न्हे ॥ वस्तु स्वर्गिची खाचित ही, मला ॥ गमत धातृनें निर्मिली इला' ॥ १० ॥ ०

**साकी**-पिलू.

काढुनि सौदागर तें तीच्या हस्तीं कंकण घाली ॥ हर्षित वेश्या होउनि त्याशीं नेम करी त्याकालीं ॥ ११ ॥

**पद.** (खाली ज्याची उपर०)

'पृथ्विमोल हें कंकण आहे ॥ मीही बात्तिस लक्षणि पाहे ॥ पृ० ॥ तीन दीन मी झालें तुमची ॥ दासी आज्ञांकित स्वामी हे ॥ पृ० ॥ काय मानसीं इच्छा प्रभुजी ॥ सांगा, पुरविन मिथ्या नोहे' ॥ पृ० ॥ १२ ॥

---

१ ब्रह्मदेवानें.

**पद.**—काफी, दीपचंदी.

सौदागरा मानवलें ॥ कोमलनयना वचन सतीचें ॥ ध्रु० ॥ काढुनि दिव्य अशा लिंगातें ॥ पुढति महानंदेचे ॥ ठेवियलें ती हर्षित झाली॥पाहुनि अनुपम तेज तयाचें॥सौ०॥१३

**पद.** (देवश्री मेनका०)

शिवभक्तीविख्यात सती ती महानंदा वेश्या ॥ ह्मणे, 'धन्य तो ज्याजवळीं हें सतत असे, जगिं या ॥ काय याचि ही प्रभा असे! मज खचित असें गमतें ॥ यावरुनी ओंवाळावीं शतकोटि कंकणांतें' ॥ १४ ॥

**अंजनीगीत.**—झिंझोटी.

स्वाधिन तें शिव-लिंग करोनी ॥ तायें सौदागर वेश्येलागुनी ॥ बोले, 'यातें फार जपूनी ॥ ठेवि महानंदे' ॥ १५ ॥

**पद.**—भूपकल्याण, दादरा.

'यापाशीं स्थित मदीय पंचप्राण गे ॥

मंगलें कि गेलें होऊनि दग्ध गे ॥ तरि अग्नी-
माजि प्रवेश मि करीन गे ॥ काठिण महा व्रत
माझें जाण सत्य गे' ॥ १६ ॥

पद. ( मी कुमार तीहि ० )

येरिनें[1] अवश्य म्हणोनी ठेवियलें नृत्या-
गारीं ॥ मग तरुणीसह मंचकिं त्या ॥ कपट-
वेशि तो त्रिपुरारी ॥ पहुडला, अंत पाहुनि
जो शेवटिं निजभक्तां तारी ॥ चाल ॥ त्या-
चिया प्रभावेंकरुनी ॥ नृत्यागरासि तो
अग्नी ॥ लागला, 'ऊठगे' ह्मणुनी ॥ तिस सा-
वध करि मदनारी ॥ चाल ॥ ऐकुनी हांक
त्याकाळीं ॥ घाबरि बहु सति ती झाली ॥१७॥

दिंडी.

तयीं वातसखा[2] बहुत चेतुनीयां ॥ जाति
ज्वाला त्या गगनपथें, वेश्या ॥ ह्मणे, 'कोणी
वीझवा तरी अग्नी' ॥ अले धांवत जन सकल
चहुंकडोनी ॥ १८ ॥

---

१ महानंदेनें. २ अग्नि.

**साकी.**—सिंधडा, धुमाळी.

धैर्यें तैशामाजि महानंदेनें उडि घालोनी ॥ कुक्कुट, मर्कट, दिधलें सोडुनि कंठ—पाश तोडोनी ॥ १९ ॥

**ओवी.**—मल्हार.

भस्म झाली समग्र नृत्यशाळा ॥ वैश्वानर मग शांत झाला ॥ यावरी बोले त्या सतीला ॥ वेशधारी सौदागर ॥ २० ॥

**पद.**—कर्नाटकी, धमार.

' दिव्य ऐसें लिंग मम गे ॥ सुरक्षित, नाहिं ? सांगे ॥ महानंदे स्तब्ध कां गे राहसी या समयिं तूं ?' ॥ २१ ॥

**पद.** (लहान वस्तु ती०)

ऐकुनि गंभिर ही वाणी ॥ क्रू[1] त्यासी बघुनी ॥ दचकाले वेश्या ती स्

1 फौसदा.

बा: काव्य २७०



धाय धाय रडुंनीयां घेई वक्षस्थळ पिट्टुनी ॥ २२ ॥

## साकी.

'उमाईशपंकजकीरा, हिमनगजामाता, ईशा ॥ संकट समयीं भक्ता तारुनि तूंचि वारिशी नाशा ॥ मग कां समयीं या ॥ पाहसि अंत प्रभूराया!' ॥ धृ० ॥ २३ ॥

## पद.–जोगी, धुमाळी.

'अहा! धूर्जटी, गिरिजारमणा! अंत काय वधया ॥ पाहण्यास ह्या कृत्या केलें? कीं सत्व त्याया? ॥ धृ० ॥ धांव! धांव!! शंकरा, गरीशा, संकट समयीं या ॥ कोण तुझ्या-ण आश्रय मातें? काय सांगु मी यो!' ॥ ज्वा ॥ २४ ॥

वीझव

## अंजनीगीत.

चहुंकडेरि मग ती हात जोडुनी ॥ बोले,

---

१ शंकरा. २ सौदागराला.

'स्वामी, प्राणाहूनी ॥ लिंग तुह्मां जें प्रिय तें अग्नीं ॥ दग्ध अहा ! झालें !!' ॥ २५ ॥

पद.–मुलतानी, धुमाळी.

कपटवेषधारी सौदागर तो ऐसें ऐकुनी ॥ बळेंची क्रुद्ध बहू होउनी ॥ नेत्र गरगरां फिरवोनीयां भृकुटी त्या चढवुनी ॥ रक्तवर्ण ते स्वनेत्र करुनी ॥ ह्मणे, 'पहावें धैर्य सतीचें किती? आळ घालुनी' ॥ ऐसा विचार करि तो मनीं ॥ 'पतिव्रता धर्म हाच का तव? नसेल तुजसम कुणी ॥ वाटतें मज, या जगिं जारिणी ॥ कथिशि काय तूं असत्य मजला? वस्तु माझि लपवुनी ॥ याचा विचार करि भामिनी' ॥ शब्द तयाचे कठिण वज्रवत् परिसुनियां कामिनी ॥ विनयें म्हणे, पदर पसरुनी॥२६॥

दिंडी.–लिलांबरी, दादरा.

'व्यर्थ कां हो कोपुनि स्वामिराजा ॥ क्लेश

---

१ भोंवया.

देतां आपुल्या जिवा[१] माझा ॥ कृतघ्नचा अपराध हा असोनी ॥ करा अनुकंपा क्रोध आवरोनी' ॥ २७ ॥

पद. (माझा कृष्ण देखिला काय० )

तयिं सौदागर तो सतिला॥बोले काय पहा ॥ धृ०॥ 'नेमाचा दिन दुसरा जाण ॥ झडकरि माझी वस्तू आण ॥ नाहिं तरी मी देतों प्राण ॥ सत्य, सत्य महानंदे' ॥त० ॥२८॥

श्लोक.—कानडा.

निष्ठूरसें वचन बोलुनि हें तयानें ॥तो रोहिताश्व बहु चेताविला त्वरेनें ॥कुंडासमीप मग येउनि तो स्मरारी ॥ झाली उडी, स्वपदिं जो प्रिय भक्त तारी ॥ २९ ॥

पद. (मज बहु चि हीं०)

मग पाहुनि हें काय सतीनें केलें ॥ याच्रकजन पाचारीले ॥ दाखवुनी त्यां सकल कोश

१ दया. २ अग्नि. ३ द्रव्याचा खजिना.

लुटवीले ॥ अति तृप्त द्विजां तार्ये केलें ॥ चाल ॥ नेसली धवल ती वसनातें ॥ चर्चिलें भस्म सर्वांगातें ॥ चाल ॥ रुद्राक्ष करीं, कंठिं बांधुनी अपुलें ॥ 'हर' ह्मणुनि दहनिं वेपु त्यजिलें ॥ मग० ॥ १० ॥

पद. (दिसलि पुनरपी०)

तृतिय नेत्रि वैश्वानर, शिरिं जल वाहे ज्याच्या झुळझूळां ॥ अभयंकर जो महायोगि गजचर्म असे तें पांघरला ॥ ध्रु० ॥ व्याघ्रांबर नेसला जयाच्या शिरिं शोभा दे चंद्रकला ॥ गळां मनुजमुंडहार फणिवर वेष्टित ज्याच्या अंगाला ॥ सूर्यबिंब उदयाचलिं निघतें, प्रकटुनि तेवीं त्या सातिला ॥ वरच्यावर कंदुकांपरी धरि; बोले तिजशीं शिव भोळा ॥' पाहुनि निःसिम भक्ति तुझी मी सुप्रसन्न झालों तुजला ॥ माग कांहिं वरदान, मनीं तूं काय इच्छिसी सांग मला'॥ तृ० ॥ ३१ ॥

---

१ अग्नींत. २ शरीर ३ चेंडूप्रमाण.

**साकी.**–पिलू, झुमाळी.

ऐकुनि वेश्या शिव वाणी ही आनंदित बहु झाली ॥ ह्मणे, 'नगरजन सर्व उद्धरुन स्वपादें नेइ ये वेळीं' ॥ ३२ ॥

**पद.** (नाहिं सुभद्रा०)

तयीं शिवानें इच्छित दिधला वर 'तथास्तु' बोलुनी ॥ माता, बंधूसह तिस नेले मिरवीत विमानीं ॥ धृ०॥ सर्व नागरिकजनही तैसे स्वपदीं नेऊनी ॥ उद्धारिले, ते तेथ राहिले शिवरूप होउनी ॥ तयीं० ॥ ११ ॥

**अंजनीगीत.**

आधी व्याधी जेथें नाहीं ॥
काम, क्रोध, द्वंद्व न दुःखें हीं ॥
तें पद पावलि महा साध्वि ही ॥
अनुनीयां वेश्या ॥ १४ ॥

**समाप्त.**

# ईशस्तवन.

---

**पद.**–भूप, त्रिताल.

पावना, हे मन तल्लिन होवो सतत तुझ्या चरणां ॥ धृ० ॥ योगीमानसपद्ममिलिंदा, प्रमोदकंदा, बहु छंदा ॥ पुरवुनि, देशी हे नगवासी, भक्तमनांशीं, मुनिवृंदा ॥ अंतीं मुक्ती, धृति तेविं अती, सन्मति ती त्या मतिमंदा ॥ देशी तूं, त्रस्तजनां अभया दिना, त्रीनयना ॥१॥ सुकाव्य सुमनीं, दृढभाव मनीं धरुनी, जनमनविश्रामा ॥ करितों पूजन, प्रिय होवो, मुग्धावनिताप्रघटितकामा ॥ मोरेश्वरसुत आत्मारामा, गिरिवरजानयनाऽरामा॥दे,सदया, सौख्य; तरी जगदाभरणा, तोष मना ॥ २ ॥

---

PUBLISHED

BY

# D. A. BROTHERS.

25, *Chendnee*,

THANA.

'जॉइन्ट स्टॉक्' छापखान्यांत छापून
प्रसिद्ध केलें.

लेखावर मेख ............ .
. दा ,, ...................... १
भालणी ......................... १
हिंदुस्थानांतील ......... ...... १ ०
पर्या विवेचन. चि निकृष्ट स्थितीनि-
...यसार. ......... .... १ ०
जाणाऱ्या विद्या... त्रे इयत्तेचे परिक्षेम
सुरापान निषेध ...... करितां)...... ... .. ०. ६

तयार आहे.

संगीत

**वसंत—इंदिरा नाटक.** (१

( प्रयोग करण्यास योग्य व सुल

**किंमत १२ आणे. ट० हा० १**

सूचना.—दहा प्रती घेणारास एक प्रत खल मिळेल. पुस्तक मुंबईत बुकसेलर्स यांच्या दुकानीं, व खालील पत्त्यावर विकत मिळे पुस्तकें दोन्ही ठिकाणीं विक

पत्ता:—डॉ० ए० ब्रदर्स, २५ चेंदणी. ठाणें.

**प्रक**

नं. २०

विषय

काव्य

संग्रहालय क्रमांक

२०

**पद**—झिंजोटी, त्रिवट.

परिसुनियां ईश—वाणी हिमनगजा कोपुनी ॥ बोले कीं, 'नवल वाटे वच तुमचें ऐकुनी' ॥ 'दाखवितों तुम्हांशि याचा प्रत्यय, ती कामिनी॥ खरि साध्वी नाहिं किंवा आहे या कुंभिनीं' ॥ परि० ॥ ७ ॥

**दिंडी.**—कानडा, दादरा.

चंडिकेशीं बोलुनी असें भोळा॥ वेश करिता सौदागरी जहाला ॥ महानंदा, पातला गृहीं तीचें ॥ झालि तन्मय सति बघुनि रूप त्याचें॥८॥

**पद.** ( तस्करांहातीं० )

स्वहस्तांकिं पूजा ॥ करुनायां त्याला ॥ सतीनें मंचाकें बैसविला ॥ कपटवेशी तो ॥ शिव त्या समयाला ॥ करीतो काय पहा कौतिला ॥ पृथ्विमोलाच्या ॥ काढि कंकणाला ॥ बघुनि तें हर्ष बहू सतिला ॥स्व०॥ ९ ॥

---

१ पार्वती.

कांदी १०१८
( १

श्लोक.-कामदा.

मग ह्मणे, तया 'पृथ्विमोल हें ॥ खचित मानवी कराणि ही नव्हे ॥ वस्तु स्वर्गिची खचित ही, मला ॥ गमत धातृनें निर्मिली इला' ॥ १० ॥

साकी-पिलू.

काढुनि सौदागर तें तीच्या हस्तीं कंकण घाली ॥ हर्षित वेश्या होउनि त्यासीं नेम करी त्याकालीं ॥ ११ ॥

पद. (ध्यालो ध्याची उपवर०)

'पृथ्विमोल हें कंकण आहे ॥ मीही बत्तिस लक्षणि पाहे ॥ धृ० ॥ तीन दीन मी झालें तुमची ॥ दासी आज्ञांकित स्वामी हे ॥ पृ० ॥ काय मानसीं इच्छा प्रभुजी ॥ सांगा, पुरविन मिथ्या नोहे' ॥ पृ० ॥ १२ ॥

---

१ ब्रह्मदेवानें.